# प्रकरण पाचवे

# सोलापूरातील बालकामगारांच्या सामाजिक समस्या

५. प्रस्तावना

५.१ बालकामगारांचे धर्मनिहाय स्वरुप

५.२ बालकामगारांचे प्रवर्गनिहाय स्वरुप

५.३ बालकामगारांचे वयानुसार वर्गीकरण

५.४ बालकामगारांचे लिंगनिहाय वर्गीकरण

५.५ बालकामगारांची शैक्षणिक पातळी

५.६ बालकामगारांचा शैक्षणिक स्तर

५.७ बालकामगारांचा साक्षरता स्तर

५.८ बालकामगारांचे शाळा सोडण्याचे कारण

५.९ बालकामगारांच्या कुटूंबात वडील हयात असलेले आणि नसलेले बालकामगार

५.१० बालकामगारांच्या कुटूंबात माता हयात असलेले आणि नसलेले बालकामगार

५.११ बालकामगारांच्या मातांची शैक्षणिक पातळी

५.१२ बालकामगारांच्या वडीलांची शैक्षणिक पातळी

५.१३ बालकामगारांच्या निवासाची स्थिती

५.१४ बालकामगारांचे काम करण्याचे कारण

५.१५ बालकामगारांची काम करण्याची परिस्थिती

५.१६ बालकामगारांचा काम करण्याचा कालावधी

५.१७ बालकामगारांचे काम करण्याचे तास

५.१८ बालकामगारांना काम करत असताना मिळणारी विश्रांती

५.१९ बालकामगारांना मिळणाऱ्या विश्रांतीचा कालावधी

५.२० बालकामगारांसोबत मालकांचे वर्तनाची पातळी

५.२१ बालकामगारांसोबत मालकांचे वर्तन

५.२२ बालकामगारांची आपल्या कामाबाबतची संतुष्टी

५.२३ बालकामगारांचे कामाच्या प्रती भावना

५.२४ बालकामगारांना मिळणाऱ्या फावल्या वेळेचा उपयोग

५.२५ बालकामगारांची महत्वाकांक्षा

५.२६ आईवडीलांना/पालकांना मदत करणारे बालकामगार

५.२७ विशेष शाळेत शिक्षण घेणारे बालकामगार

# प्रकरण पाचवे
# सोलापूरातील बालकामगारांच्या सामाजिक समस्या

## ५. प्रस्तावना :

प्रस्तुत प्रकरण हा संशोधनाचा मुख्य गाभा आहे. कारण, प्रस्तुत प्रकरणात अभ्यासासाठी निवडलेल्या बालकामगारांची सामाजिक समस्यांचा, बालकामगारांच्या पुनर्वसनाचा शोध घेतला आहे. बालकामगारांची सामाजिक स्थिती, समस्या, बालकामगारांचे पुनर्वसन अभ्यासताना प्रामुख्याने अनुसूचीद्वारे विचारण्यात आलेल्या प्रश्नांतून व मिळालेल्या प्राथमिक माहितीतून सोलापूरातील बालकामगारांच्या समस्या व पुनर्वसनाची मांडणी केली आहे. सोलापूरातील एकूण २६० बालकामगारांची अभ्यासासाठी निवड केली आहे. या २६० बालकामगारांमध्ये सोलापूर शहरातील बालकामगार बहूलता क्षेत्रातील १३० बालकामगार व राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पातील विशेष शाळेतील शैक्षणिक पुनर्वसनातील १३० बालकामगार असे एकूण २६० बालकामगारांची निवड करण्यात आली आहे. या २६० बालकामगारांच्या अभ्यासावरुन निघालेले निष्कर्ष संपूर्ण सोलापूर जिल्हयासाठी लागू केले आहेत. एकूणच प्रस्तूत प्रकरणात अतिशय सुक्ष्मरित्या सोलापूरातील बालकामगारांची सामाजिक स्थिती, समस्या, व त्यांचे पुनर्वसनाची स्थिती स्पष्ट केली आहे.

## ५.१ बालकामगारांचे धर्मनिहाय स्वरुप :

भारत हा एक धर्मनिरपेक्ष देश आहे. जिथे अनेक धर्माचे लोक राहतात. परंतू अर्थशास्त्रीय दृष्टीकोनातून धर्म या घटकाचे मनुष्याच्या संपूर्ण जीवन पातळीवर आर्थिक व सामाजिक दृष्टीने परिणाम होते. मुख्यत: भारतात अनेक धर्मातील लोक आर्थिक व सामाजिकदृष्टया कमकुवत असल्याने त्या धर्मात बालकामगारांची समस्या जास्त पसरत चालली आहे. त्यामुळेच प्रस्तुत प्रकरणात बालकामगारांची धर्मनिहाय स्थिती अभ्यासणे महत्वाचे आहे. पुढील तक्ता क्र. ५.१ मध्ये बालकामगारांचे धर्मनिहाय स्वरुप स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ५.१**
**बालकामगारांचे धर्मानुसार वर्गीकरण.**

| अ. क्र. | धर्म | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | हिंदू | १४७ | ५६.५ |
| २. | बौद्ध | ६० | २३.१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | ख्रिश्चन | १८ | ६.९ |
| ४. | मुस्लीम | ३५ | १३.५ |
| | **एकूण** | **२६०** | **१००.०** |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखात बालकामगारांचे धर्म निहाय स्वरुप दर्शविले आहे.

**आलेख क्र. ५.१**

**बालकामगारांचे धर्मनिहाय स्वरुप**




तक्ता क्र. ५.१ मध्ये अभ्यासासाठी निवडलेल्या बालकामगारांची धर्मानुसार विभागणी दर्शविलेली आहे. एकूण २६० बालकामगारामध्ये ५६.५% बालकामगार हे हिंदू धर्माचे आहेत. २३. १% बालकामगार हे बौद्ध धर्माचे आहेत. ख्रिश्चन धर्माचे बालकामगार हे ६.९% आहेत. व मुस्लीम धर्माचे बालकामगार हे १३.५% आहेत.

## ५.२ बालकामगारांचे प्रवर्गनिहाय स्वरुप :

बालकामगारांचे धर्मनिहाय अध्ययन केल्यानंतर त्यांचे प्रवर्गनिहाय स्वरुप अभ्यासणे गरजेचे आहे. कारण, प्रस्तुत संशोधनाचा मुख्य उद्देश असा आहे की, बालकामगारांच्या आर्थिक व सामाजिक स्थिती, समस्येत बालकामगारांतील विविध प्रवर्गातील बालकामगारांचे प्रमाण शोधणे होय. म्हणूनच संशोधकाने बालकामगारांच्या प्रवर्गनिहाय अभ्यास केला आहे. पुढील तक्ता क्र. ५.२ मध्ये बालकामगारांचे जाती—जमातीनुसार वर्गीकरण केले आहे.

**तक्ता क्र. ५.२**

**बालकामगारांचे जाती–जमातीनुसार वर्गीकरण.**

| अ. क्र. | प्रवर्ग | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | खुला वर्ग | ६० | २३.१ |
| २. | ओ.बी.सी | ७१ | २७.३ |
| ३. | एस.सी. | ९५ | ३६.५ |
| ४. | एस.टी. | ३४ | १३.१ |
| | **एकूण** | **२६०** | **१००.०** |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखात बालकामगारांचे प्रर्वग निहाय स्वरुप दर्शविले आहे.

**आलेख क्र. ५.२**

**बालकामगारांचे प्रवर्गनिहाय स्वरुप**




तक्ता क्र. ५.२ मध्ये अभ्यासासाठी निवडलेल्या बालकामगारांची जाती–जमातीनुसार विभागणी दर्शविलेली आहे. एकूण २६० बालकामगारामध्ये ओपन जातीचे २३.१% बालकामगार आहेत. इतर मागासवर्गातील बालकामगार २७.३% आहेत. अनुसूचित जातीचे ३६.५% बालकामगार आहेत. व अनुसूचित जमातीचे १३.१% बालकामगार आहेत. सोलापूर मधील एकूण लोकसंख्येच्या तुलनेत निवडलेल्या अध्ययन क्षेत्रात अनुसूचित जातीचे

बालकामगारांची संख्या तुलनेने जास्त आहे. कारण या जातीमध्ये बहूसंख्य लोक अशिक्षित आहेत. आर्थिक दृष्टया कमकुवत आहेत. शिक्षणाचा दर्जा चांगल्या पद्धतीचा नसल्यामुळे व आर्थिक दृष्टया गरीब असल्यामुळे या जातीमधील कुटूंबातील सर्व लोकांना काम करावे लागते. विशेष कौशल्य नसल्याने मिळेल ते काम करतात. परंतू कामाच्या मोबदल्यात त्यांना योग्यतो मोबदला मिळत नाही. परिणामी घरखर्च चालविणे मुश्कीलीचे बनते. म्हणून लहान मुलांना देखिल काम करावे लागते. इतर मागासवर्गीय व अनुसूचित जमातीच्या कामगारांची दशासुद्धा जवळपास तशीच आहे. यातील महत्वाचे कारण गरीबी आणि अशिक्षितपणा होय.

### ५.३ बालकामगारांचे वयानुसार वर्गीकरण :

भारतात बालकामगार (प्रतिबंध व विनियमन) अधिनियम १९८६ अन्वये बालकामगारांची वयोमर्यादा १४ वर्षे आहे. बालकामगारांच्या वयोरचनेचा अभ्यास करण्याचा मुख्य उद्देश असा की, १४ वर्ष व त्यापेक्षा कमी वय असणाऱ्या बालकांचा शोध घेणे. कारण १४ वर्षापेक्षा कमी वयाचे बालक बालकामगार म्हणून काम करत असेल तर त्या जिल्हयासाठी, राज्यासाठी व देशासाठी चिंतेचा विषय आहे. प्रस्तूत पाहणीतील बालकामगारांचे वयानूसार वर्गीकरण तक्ता क्र. ५.३ मध्ये स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ५.३**

**बालकामगारांचे वयानुसार वर्गीकरण.**

| अ. क्र. | वय | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | ९ | १४ | ५.४ |
| २. | १० | ३९ | १५.० |
| ३. | ११ | ४५ | १७.३ |
| ४. | १२ | ८१ | ३१.२ |
| ५. | १३ | ४२ | १६.२ |
| ६. | १४ | ३९ | १५.० |
| | **एकूण** | **२६०** | **१००.०** |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखात बालकामगारांचे वयानुसार वर्गीकरण दर्शविले आहे.

## आलेख क्र. ५.३

## बालकामगारांचे वयानुसार वर्गीकरण




तक्ता क्र. ५.३ मध्ये अभ्यासासाठी निवडलेल्या बालकामगारांची वयानुसार विभागणी दर्शविलेली आहे. एकूण २६० बालकामगारामध्ये ९ वर्षापर्यंतच्या वयोगटाचे ५.४% बालकामगार आहेत. वयवर्षे १० च्या वयोगटातील एकूण १५.०% बालकामगार आहेत. वयवर्षे ११ च्या वयोगटाचे १७.३% बालकामगार आहेत. वयवर्षे १२ च्या वयोगटातील ३१.२ बालकामगार आहेत. वयवर्षे १३ च्या वयोगटातील १६.२% बालकामगार आहेत. आणि वयवर्षे १४ च्या वयोगटातील १५.०% बालकामगार आहेत. याचाच अर्थ असा की, बालक किंवा बालिका जेव्हा थोडेफार समजण्याच्या स्थितीत असतात. तेव्हा लगेच त्यांना काम करण्यासाठी पाठवून दिले जाते. ९ वयवर्षे वयोगटातील मुले बऱ्याच प्रमाणात लहान असल्यामुळे त्यांना तेवढया मोठया प्रमाणात कामावर पाठवून दिले जात नाही. याचा अर्थ असा नव्हे की ते कामच करत नाही. त्यांच्या संख्याही ५.४% एवढी आहे. इतर वयोगटाच्या तुलनेत ही संख्या कमी आहे. परंतू हे चिंतेची बाब आहे की, एवढया लहान मुलांनाही काम करावे लागत आहे. त्यांची शारिरीक व मानसिक वाढ सुद्धा व्यवस्थीत झालेली नाही आणि त्यांना श्रम बाजारात कामासाठी पाठविले जात आहे. त्याचप्रमाणे वयवर्षे १० ते १४ वयोगटातील मुलांना जास्त काम करावे लागत आहे. यामध्ये वयवर्षे १२ च्या वयोगटातील बालक–बालिकांचे काम करण्याचे प्रमाण जास्त आहे.

## ५.४ बालकामगारांचे लिंगनिहाय वर्गीकरण :

कामगार या घटकात प्रामुख्याने पुरुष व स्त्री कामगार येतात. विशेषत: हा वर्ग कार्यकारी वर्ग असून तो साधारणत: १५ ते ४९ या वयोगटातील असतो. परंतू औद्योगिक क्रांतीनंतर कामगार घटकात बालकामगार समस्येचा जन्म झाल्यापासून यामध्ये अल्पवयीन बालक व बालिका बालकामगार आढळून येतात. सोलापूरातील बालकामगारांचा अभ्यास करताना बालकामगारात लिंगनिहाय तफावत आढळून आलेली नाही. पुढील तक्ता क्र. ५.४ मध्ये बालकामगारांचे लिंगनिहाय वर्गीकरण स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ५.४**

**बालकामगारांचे लिंगानुसार वर्गीकरण.**

| अ. क्र. | लिंग | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | बालिका | १२० | ४६.२ |
| २. | बालक | १४० | ५३.८ |
| | **एकूण** | **२६०** | **१००.०** |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

वरील तक्ता क्र. ५.४ मध्ये एकूण बालकामगार २६० आहेत त्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ४६.२ आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ५३.८ आहे. यावरुन असे लक्षात येते की, निवडलेल्या बालकामगारांमध्ये बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे.

पुढील आलेखात बालकामगारांचे लिंगानुसार वर्गीकरण दर्शविण्यात आले आहे.

**आलेख क्र. ५.४**

**बालकामगारांचे लिंगनिहाय वर्गीकरण**



तक्ता क्र. ५.४ मध्ये अभ्यासासाठी निवडलेल्या बालकामगारांची लिंगानुसार विभागणी दर्शविलेली आहे. एकूण २६० बालकामगारामध्ये बालिका कामगारांची संख्या ४६.२% आहे. आणि बालक कामगारांची संख्या ५३.८% आहे. याचाच अर्थ असा की, बालक कामगारांची संख्या बालिका कामगारांपेक्षा जास्त आहे. बालक कामगारांच्या तुलनेत बालिका कामगारांचे प्रमाण कमी असली तरी बालिकांच्या संदर्भात विचार केल्यास ती संख्याही विचार करण्यासारखी आहे. ही आकडेवारी ५०% च्या आसपास आहे.

### ५.५ बालकामगारांची शैक्षणिक पातळी :

मानवाच्या अन्न, वस्त्र, निवारा हया तीन मुलभूत गरजा होत्या. परंतू कालांतराने या गरजांत शिक्षण आणि आरोग्य यांचाही समावेश करण्यात आला. म्हणजेच शिक्षण ही मानवाची मुलभूत गरज आहे. कारण शिक्षणामुळे व्यक्तीच्या सुप्त गुणांचा विकास होतो आणि पर्यायाने त्याचे रुपांतर मानव विकासात होते. एकंदरीत विकासाची प्राथमिक अट म्हणजे शिक्षण होय. भारताच्या संविधानामध्ये १४ वर्षे वयोगटाच्या प्रत्येक व्यक्तीस शिक्षण मिळायला पाहिजे हा त्यांचा मुलभूत अधिकार आहे असे नमुद केले आहे. परंतू तो अधिकार सर्वांनाच मिळतो का? याचा शोध घेण्यासाठी वय वर्षे १४ च्या आतील बालक बालिकांना अनुसूचीद्वारे विचारण्यात आलेल्या प्रश्नांतून विचारण्यात आले. सोलापूरातील बालकामगारांचा शिक्षणाचा दर्जा पाहिल्यानंतर असे दिसून येते. त्या बालकांचे फक्त नांव शाळेत दाखले केले आहे. प्रत्यक्षात मात्र नियमित ते शाळेत जात नाही. ज्यांचे शिक्षण चौथी पर्यंतचे झाले आहे त्यांना लिहीता वाचता सुद्धा येत नाही. याचा अर्थ असा की शासनाला या बाबींकडे गांभिर्याने पाहण्याची आवश्यकता आहे. कारण सुशिक्षित बालक हाच उद्याच्या भारताचा भविष्य आहे.पुढील तक्ता क्र. ५.५ मध्ये बालकामगारांची शैक्षणीक पातळी स्पष्ट केली आहे.

**तक्ता क्र. ५.५**

**बालकामगारांची शैक्षणिक पातळी.**

| अ.क्र. | शैक्षणिक पातळीचे स्वरुप | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | अशिक्षित | १३ | ५.० |
| २. | बालवाडी ते दुसरी | ३५ | १३.५ |
| ३. | तिसरी ते चौथी | ७५ | २८.८ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | पाचवी ते सहावी | ९२ | ३५.४ |
| ५. | सातवी ते आठवी | ४५ | १७.३ |
| | **एकूण** | **२६०** | **१००.०** |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखात बालकामगारांची शैक्षणिक पातळी दर्शविण्यात आली आहे.

**आलेख क्र. ५.५**

**बालकामगारांची शैक्षणिक पातळी**




तक्ता क्र. ५.५ मध्ये अभ्यासासाठी निवडलेल्या बालकामगारांची शैक्षणीक पातळी दर्शविली आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये ५% बालकामगार अशिक्षित आहेत. यांना शाळेत जाण्याची संधीही मिळालेली नाही. बालकामगारांमध्ये १३.५% केवळ बालवाडी ते दुसरीपर्यंत शाळेत गेलेले आहेत. याचा अर्थ या बालकामगारांना व्यवस्थित लिहीता—वाचता येत नाही. बालकामगारांमध्ये तिसरी ते चौथी वर्गापर्यंत पोहचलेल्या बालकामगारांची संख्या २८.८% आहे. वरील तिन्ही गटाचे एकत्रित विचार करता या बालकामगारांचे प्रमाण ४७.३% होते. याचा अर्थ अभ्यासासाठी निवडलेल्या जवळपास निम्मा (५०%) बालकामगारांचे शिक्षणाचे स्वरुप अशिक्षित, प्राथमिक शिक्षणाचे आहे. यात महत्वाचे म्हणजे ५२.७% बालकामगारांनी पाचवी ते आठवी पर्यंतचे शिक्षण घेतले आहे. यांची विभागणी केल्यास पाचवी व सहावी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या बालकामगारांची संख्या ३५.४% आहे आणि सातवी ते आठवी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या बालकामगारांची संख्या केवळ १७.३ टक्के आहे. बालकामगारांमध्ये एक गट अशिक्षित, दुसरा गट प्राथमिक शिक्षणाचा आणि तिसरा गट उच्च प्राथमिक शिक्षणाच्या बालकामगारांचा असे तीन

गटात यांची विभागणी करता येते. याशिवाय यांना मिळालेल्या शिक्षणाचा दर्जा याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होतो. एकूण बालकामगारांमध्ये ज्यांना बऱ्यापैकी लिहता–वाचता येते त्यांचे कामाच्या ठिकाणी होणारे आर्थिक शोषण काही प्रमाणात कमी असण्याची शक्यता असते. त्याचप्रमाणे ज्या बालकामगारांचे शिक्षण बालवाडी ते चौथी पर्यत झाले आहे त्यांना लिहिता वाचता येते का असे विचारले असता त्यांना लिहिता वाचता येत नाही असे आढळून आले. याचा अर्थ असा की या बालकामगारांना शाळेत तर दाखल केले परंतू त्यांनी व्यवस्थित शिक्षण घेतले नाही. शाळेत फक्त नाव दाखल होते मात्र ते शाळेत जात नसून कामावर जात होते असे आढळून आले. म्हणजेच त्यांच्या शिक्षणाच्या दर्जा याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होतो. परंतू ज्यांचे काहीच शिक्षण झाले नाही आणि लिहीता–वाचता येण्यासारखे देखील ज्ञान त्यांना शाळेतून मिळाले नसेल तर त्या बालकामगारांचे शोषण कोणीही सहजपणे करु शकतो हे वास्तव आपल्याला लक्षात घ्यावे लागेल.

यामध्ये आणखी एक गोष्ट नमुद कराविशी वाटते की, पाचवी ते आठवी पर्यंतचे शिक्षण घेणाऱ्या बालकामगारांपैकी बरेच बालकामगार हे नियमित शाळेत जात नाही. कारण काम करावे लागत असल्याने त्यांना शाळेत जाण्यास मिळत नव्हते. जे काही शिक्षण घेतले आहे त्या शिक्षणाचा दर्जासुद्धा खूप निम्न दर्जाचा आहे. शिक्षणाच्या निम्न दर्जामुळे त्यांच्यावर होणाऱ्या शोषणाची मात्रा सुद्धा बरीच आहे.

## ५.६ बालकामगारांचा शैक्षणीक स्तर :

मानवी जीवनात शिक्षणाला अन्यन्यसाधारण महत्व आहे. कारण शिक्षणामुळे व्यक्तीच्या सुप्त गुणांचा विकास होतो आणि पर्यायाने त्याचे रुपांतर मानव विकासात होतो. प्रस्तुत पाहणीतील जवळपास ७३ टक्के बालकामगारांनी शाळा सोडली आहे. काही बालकामगारांनी शाळेत जावेसे वाटते असे उत्तर दिले तर काही बालक कामाला जात असल्यामुळे कधीतरी शाळेत जातो असे पाहणीत आढळून आले. पुढील तक्ता क्र. ५.६ मध्ये बालकामगारांचा शैक्षणिक स्तर स्पष्ट केला आहे.

### तक्ता क्र. ५.६

### बालकामगारांचा शैक्षणिक स्तर.

| अ.क्र. | बालकामगारांचा शैक्षणिक स्तर | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | शाळा सोडली | १९१ | ७३.५ |
| २. | शाळेत जावेसे वाटते | ४१ | १५.८ |
| ३. | शाळेत जातो | ७ | २.७ |
| ४. | शाळेत कधीतरी जातो | २१ | ८.१ |
| | **एकूण** | **२६०** | **१००.०** |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखामध्ये बालकामगारांचा शैक्षणिक स्तर दर्शविला आहे.

### आलेख क्र. ५.६

### बालकामगारांचा शैक्षणिक स्तर




तक्ता क्र. ५.६ मध्ये अभ्यासासाठी निवडलेले बालकामगारांचे शैक्षणिक स्तर दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये ७३.५% बालकामगारांना शाळा सोडली आहे. १५.८% बालकामगारांना शाळेत जावेसे वाटते. २.७% बालकामगार हे शाळेत जातात. शाळेतून आल्यानंतर ते श्रम करीत असतात. ८.१% बालकामगार हे कधीतरी शाळेत जातात. याचा अर्थ बहूतांशी बालकामगार हे काम करावे लागत आहे म्हणून त्यांना शाळा सोडावी लागली. व बरेच बालकामगार असेही आहेत ज्यांना शाळेत जाळेत जाणे आवडत नाही. कारण त्यांना शाळेत शिकविले काही समजत नाही. अभ्यास न केल्यामुळे प्रसंगी ओरडा किंवा शिक्षाही भोगावी लागते म्हणून काहींनी शाळा सोडलेली आहे. परंतू काही बालकामगार असेही आहेत जे कधीतरी शाळेत जातात त्यात निरंतरता नसते. पालकांना जबरदस्ती केली त्यावेळी ते

शाळेत जातात. परंतू बरेच पालक असे आहेत ज्यांना कामामुळे मुलांकडे लक्ष देणे जमत नाही. याचाच फायदा हे बालक घेतात व कधीतरी मधूनच शाळेत जातात.

### ५.७ बालकामगारांचे साक्षरता स्तर :

प्रस्तुत पाहणीतील बालकामगारांच्या समस्येचा अभ्यास करताना बालकामगारांच्या साक्षरता स्तराचा अभ्यास करणे महत्वाचे आहे. कारण त्यांच्या साक्षरतेवरुन त्यांचा शैक्षणिक विकास लक्षात येईल. पुढील तक्ता क्र. ५.७ मध्ये बालकामगारांचा साक्षरता स्तर स्पष्ट केला आहे.

**तक्ता क्र. ५.७**

**बालकामगारांचे साक्षरता स्तर.**

| अ.क्र. | साक्षरता दर | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | अशिक्षित | २ | ०.८ |
| २. | प्राथमिक | २०५ | ७८.८ |
| ३. | उच्च प्राथमिक | ५० | १९.२ |
| ४. | माध्यमिक | ३ | १.२ |
| | **एकूण** | **२६०** | **१००.०** |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखामध्ये बालकामगारांचा साक्षरता स्तर दर्शविले आहे.

**आलेख क्र. ५.७**

**बालकामगारांचा साक्षरता स्तर**



तक्ता क्र. ५.७ मध्ये अभ्यासासाठी निवडलेले बालकामगारांचे साक्षरता स्तर दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये ०.८% बालकामगार हे अशिक्षित आहेत. ७८.८% बालकामगारांनी प्राथमिक पर्यंतचे शिक्षण घेतलेले आहे. १९.२% बालकामगारांनी प्राथमिक पेक्षा जास्त पर्यंतचे शिक्षण घेतलेले आहे. १.२% बालकामगारांनी हायस्कूल पर्यंतचे शिक्षण घेतलेले आहे. परंतू ज्यांनी प्राथमिक, उच्च प्राथमिक व हायस्कूलचे शिक्षण घेतलेले आहे त्यांच्या शिक्षणाचा दर्जा इतरांच्या तुलनेत खूप निम्न दर्जाचा आहे. काहींना लिहीता वाचता सुद्धा येत नाही. यामुळे अडचण ही निर्माण होते की कोणीही सहजपणे यांचे शोषण करु शकतो. बालकामगारांसाठी असलेल्या योजना किंवा इतर योजनांची माहिती किंवा महत्व त्यांना समजत नाही. ही विचार करण्यासारखी बाब आहे.

### ५.८ बालकामगारांचे शाळा सोडण्याचे कारण :

प्रस्तूत पाहणीत असे बरेच बालकामगार आहेत ज्यांनी शाळा सोडली आहे. बालकांनी शाळा सोडल्यामुळे त्यांच्या पालकांना काहीच गैर वाटत नाही. कारण स्वत: बरेच पालक अशिक्षित आहेत. त्यांना शिक्षणाचे महत्व माहित नाही. प्रत्यक्ष पाहणीत अनुसूचीद्वारे विचारलेल्या प्रश्नांद्वारे असे आढळून आले की, बालकामगारांचे शाळा सोडण्यामागचे विविध कारण आहेत. असे कोणते कारण आहेत ज्यामुळे बालकामगारांना शाळा सोडावी लागली ते पुढील तक्ता क्र. ५.८ मध्ये स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ५.८**

**बालकामगारांचे शाळा सोडण्याचे कारण.**

| अ.क्र. | शाळा सोडण्याचे कारण | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | शाळेत जावेसे वाटत नाही | २० | ८.४ |
| २. | शाळेचे वातावरण आवडत नाही | ९ | ३.८ |
| ३. | शिक्षक शिक्षा करतात | ६ | २.५ |
| ४. | गरीबी | १५ | ६.३ |
| ५. | घरातील वातावरण | १६८ | ७०.६ |
| ६. | घरात कोणी शिकले नाहीत | ४ | १.७ |
| ७. | काम करत असल्यामुळे | १६ | ६.७ |
| | **एकूण** | **२३८** | **१००.०** |
| | **लागू नसलेले** | **२२** | |
| | **एकूण** | **२६०** | |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखामध्ये बालकामगारांचे शाळा सोडण्याचे कारण दर्शविले आहे.

**आलेख क्र. ५.८**

**बालकामगारांचे शाळा सोडण्याचे कारण**




तक्ता क्र. ५.८ मध्ये अभ्यासासाठी निवडलेले बालकामगारांचे शाळा सोडण्याचे कारण दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये ८.४ %बालकामगारांनी शाळेत जावेसे वाटत नाही म्हणून शाळा सोडलेली आहे.  ३.८%बालकामगारांना शाळेचे वातावरण आवडत नाही म्हणून शाळा सोडलेली आहे. २.५%बालकामगारांनी शाळेत शिक्षक शिक्षा करतात म्हणून शाळा सोडली आहे. ६.३%बालकामगारांनी घरीतील गरीबी मुळे शाळा सोडली आहे. बरेच बालकामगारांचे पालक शिक्षणाचा खर्च पेलवू शकत नाही त्यांना शिक्षणाचे महत्वही नाही. ७०.६%बालकामगारांनी घरातील वातावरणामुळे शाळा सोडली आहे. कुटूंबामध्ये पैशासाठी होणारे रोजचे भांडण, दारु वगैरे व्यसनापायी होणारे भांडण वगैरे वातावरणामुळे त्यांनी शाळा सोडली. कामासाठी बाहेर गेल्यावर या वातावरणातून काही काळ मुक्ती मिळेल त्याच बरोबर काही पैसाही मिळेल म्हणून शाळा सोडून काम करु लागले.  १.७%बालकामगार हे घरात कोणी शिकले नाही. काम करतात. त्यांना शिक्षणाचे महत्व नाही. म्हणून त्यांनीही शाळा सोडली. ६.७%बालकामगारांनी काम करत असल्यामुळे शाळा सोडली. काम करत असताना त्यांना शाळेत जायला मिळत नाही. लागू नसलेले २२ बालकामगार आहेत.

## ५.९ बालकामगारांच्या कुटूंबात वडील हयात असलेले आणि नसलेले बालकामगार :

प्रस्तुत अभ्यासात बालकामगारांचे वडील हयात आहेत किंवा नाहीत याचा अभ्यास करणे महत्वाचे आहे. कारण, ज्या कुटूंबातील बालकामगारांचे वडील हयात नाहीत त्या कुटूंबाची सर्व जबाबदारी त्या बालकाच्या आईवर असते. परंतू अध्ययनाच्या वेळी असे आढळून आले आहे की बालकामगारांच्या मातांना उत्पन्न खूप कमी मिळते. परिणामी बालकांना काम करावे लागते. तसेच ज्या कुटूंबामध्ये वडील हयात आहेत त्याठिकाणी एकतर ते बेरोजगार आहेत किंवा त्यांनाही मिळणारे उत्पन्न कमी आहे. पुढील तक्ता क्र. ५.९ मध्ये बालकामगारांच्या कुटूंबात वडील हयात असलेले आणि नसलेले बालकामगार स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ५.९**

**बालकामगारांच्या कुटूंबात वडील हयात असलेले आणि नसलेले बालकामगार**

| अ. क्र. | वडील | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | वडील आहेत. | २०४ | ७८.५ |
| २. | वडील नाहीत. | ५६ | २१.५ |
| | **एकूण** | **२६०** | **१००.०** |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखामध्ये बालकामगारांचे वडील हयात आहेत किंवा नाहीत हे दर्शविले आहे.

**आलेख क्र. ५.९**

**बालकामगारांचे कुटूंबात वडील हयात असलेले किंवा नसलेले बालकामगार**



तक्ता क्र. ५.९ मध्ये अभ्यासासाठी निवडलेल्या बालकामगारांचे वडील हयात आहेत किंवा नाही हे दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये २०४ बालकामगारांचे वडील हयात आहेत. आणि ५६ बालकामगारांचे वडील हयात नाहीत म्हणजे त्यांचा मृत्यु झाला आहे. ५६ बालकामगारांचे वडील हयात नाहीत म्हणजे त्यांच्या कुटूंबातील संपूर्ण जबाबदारी त्यांच्या आईवर आहे. मोठे कुटूंब आणि कुटूंब प्रमुखाचा मृत्यू यामुळे बालकामगारांनाही काम करावे लागत आहे. काम करत असल्यामुळे हे बालकामगार शाळेत सुद्धा जावू शकत नाहीत. मिळेल ते काम करावे लागत असल्यामुळे त्याचे शोषणही होत असते. त्याचप्रमाणे ज्या २०४ बालकामगारांचे वडील हयात आहेत त्या बालकामगारांपैकी काही बालकामगारांचे वडील बेरोजगार आहेत. काही बालकामगारांच्या वडीलांना निरनिराळया प्रकारचे व्यसन आहे. बहूसंख्य बालकामगारांचे वडील व्यसनाच्या आहारी गेलेले आहेत. त्यामुळे ते आपल्या लहान मुलांकडून काम करवून घेत आहेत. मुबलक उत्पन्नाच्या अभावी घरात रोजचे भांडणे होत असतात त्याचा परिणामही या बालकामगारांवर होत असतो. काही बालकामगारांचे वडील कुटूंबाचे पालनपोषण व्यवस्थित करु शकत नाहीत म्हणून हयात तर आहेत परंतू ते घर सोडून गेलेले आहेत.

**५.१० बालकामगारांच्या कुटूंबात माता हयात असलेले आणि नसलेले बालकामगार :**

प्रस्तुत अभ्यासात बालकामगारांचे माता हयात आहेत किंवा नाहीत याचा अभ्यास करणे महत्वाचे आहे. कारण, ज्या कुटूंबातील बालकामगारांचे माता हयात नाहीत त्यांची परिस्थिती विशेष चिंताजनक आहे. वडीलांना मिळणारे कमी उत्पन्न, बेरोजगारी यामुळे बालकांना काम करावे लागत आहे. पुढील तक्ता क्र. ५.१० मध्ये बालकामगारांच्या कुटूंबात माता हयात असलेले आणि नसलेले बालकामगार स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ५.१०**

**बालकामगारांच्या कुटूंबात माता हयात असलेले आणि नसलेले बालकामगार**

| अ. क्र. | माता | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | माता आहेत. | २५० | ९६.२ |
| २. | माता नाहीत. | १० | ३.८ |
| | **एकूण** | **२६०** | **१००.०** |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखात बालकामगारांच्या कुटूंबात माता हयात असलेले आणि नसलेले बालकामगार दर्शविले आहे.

**आलेख क्र. ५.१०**

**बालकामगारांच्या कुटूंबात माता हयात असलेले आणि नसलेले बालकामगार**




तक्ता क्र. ५.१० मध्ये अभ्यासासाठी निवडलेल्या बालकामगारांची आई हयात आहेत किंवा नाही हे दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये २५० बालकामगारांची आई हयात आहेत आणि १० बालकामगारांची आई हयात नाही. ज्या १० बालकामगारांची आई हयात नाही त्या बालकामगारांची स्थिती विशेष चिंताजनक आहे. बऱ्याच बालकामगारांची आई दारिद्रयामूळे आणि गरीबीमुळे सतत काम करण्यामुळे आजारी आहेत. याचा परिणाम अधिकतेने बालिका कामगारांवर होत आहे. बालिका कामगारांना घरात आईला मदत करावे लागत आहे आणि त्याचबरोबर बाहेरही काम करावे लागते.

### ५.११ बालकामगारांच्या मातांची शैक्षणिक पातळी :

कुटूंबातील पालक शिक्षित असेल तर त्या कुटूंबातील प्रत्येक व्यक्ती शिक्षित होऊ शकतो. विशेषत: कुटूंबामध्ये आई शिक्षित असल्यास कुटूंबातील पाल्याचा शैक्षणिक विकासास मोठया प्रमाणात चालना मिळते. प्रस्तुत अध्ययनात निवडलेल्या बालकामगारांपैकी बहुतांशी

बालकामगारांच्या माता हया अशिक्षित आहेत. पुढील तक्ता क्र. ५.११ मध्ये बालकामगारांच्या मातांची शैक्षणिक पातळी स्पष्ट केली आहे.

**तक्ता क्र. ५.११**

**बालकामगारांच्या मातांची शैक्षणिक पातळी.**

| अ. क्र. | बालकामगारांच्या मातांची शैक्षणिक पातळी | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | अशिक्षित | १५४ | ६१.६ |
| २. | पहिली ते चौथी | ६८ | २७.२ |
| ३. | पाचवी ते सातवी | १७ | ६.८ |
| ४. | आठवी ते दहावी | १० | ४.० |
| ५. | अकरावी ते बारावी | १ | ०.४ |
| ६. | **एकूण** | **२५०** | **१००.०** |
| ७. | **लागू नसलेले** | **१०** | **३.८** |
| | **एकूण** | **२६०** | |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखात बालकामगारांच्या मातांची शैक्षणिक पातळी दर्शविण्यात आली आहे.

**आलेख क्र. ५.११**

**बालकामगारांच्या मातांची शैक्षणीक पातळी**



तक्ता क्र. ५.११ मध्ये अभ्यासासाठी निवडलेल्या बालकामगारांच्या मातांची शैक्षणिक पातळी दर्शविली आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये १५४ (६१.६%) बालकामगारांच्या माता हया अशिक्षित आहेत. ६८ (२७.२%) बालकामगारांच्या मातांनी १ ली ते ४ थी पर्यंतचे शिक्षण घेतलेले आहे. १७ (६.८%) बालकामगारांच्या मातांनी ५ वी ते ७ वी पर्यंतचे शिक्षण घेतले आहे. आणि १० (४.०%) बालकामगारांच्या मातांनी ८ वी ते १० वी पर्यंतचे शिक्षण घेतलेले आहे. त्याचप्रमाणे १(.४%) बालकामगाराच्या आईने १२ वी पर्यंतचे शिक्षण घेतलेले आहे. याचा अर्थ असा की जवळजवळ निम्म्यापेक्षा (६१.६%) बालकामगारांच्या मातांनी शिक्षण घेतलेले नाही त्या अशिक्षित आहेत. याचा अर्थ त्या मातांना शिक्षणाचे महत्व जास्तसे माहित नाही. सुशिक्षित मातांना शिक्षणाचे महत्व माहित असते. त्या आपल्या मुलांना चांगले शिक्षण देतात. परंतू अध्यनात निम्म्या बालकामगारांच्या माता हया अशिक्षित असल्याचे आढळल्याने त्यांनी आपल्या मुलांच्या शिक्षणाला तिला महत्व दिले नाही. योग्य ते चांगले शिक्षण घेतल्याने आपल्या मुलांचे भविष्य चांगले बनेल, त्यांचा विकास होईल याकडे गांभिर्याने पाहिले नाही. उलट अपत्य थोडाफार समजण्यास योग्य झाल्यावर त्याला काम करण्यास पाठवून दिले. त्यामुळे मुलाचा जो विकास व्हायचा होता तो झाला नाही. आणि मिळेल ते काम केल्यामुळे त्यांच्या जे कौशल्य निर्माण व्हायला पाहिजे होते ते निर्माण झाले नाही. त्यामुळे कामाच्या ठिकाणी या बालक–बालिकांचे शोषण होत राहिले. शासनाच्या ज्या योजना आहेत याची माहिती केवळ अशिक्षितपणा यामुळे त्यांच्यापर्यंत पोहचत नाहीत. असे म्हणले जाते की, घरातील स्त्री ही शिकलेली पाहिजे जेणेकरुन त्या कुटूंबाचे कल्याण होते. परंतू ही बाब अशा कुटूंबात दिसून येत नाही. लागू नसलेले १० बालकामगार आहेत.

### ५.१२ बालकामगारांच्या वडीलांची शैक्षणिक पातळी :

प्रस्तूत अध्ययनात बरेच बालकामगारांचे वडील अशिक्षित असल्याचे आढळून आले आहे. पुढील तक्ता क्र. ५.१२ मध्ये बालकामगारांच्या वडीलांची शैक्षणिक पातळी स्पष्ट केली आहे.

## तक्ता क्र. ५.१२

## बालकामगारांच्या वडीलांची शैक्षणिक पातळी.

| अ.क्र. | बालकामगारांच्या वडीलांची शैक्षणिक पातळी | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | अशिक्षित | ७७ | ३७.७ |
| २. | पहिली ते चौथी | ६९ | ३३.८ |
| ३. | पाचवी ते सातवी | ३५ | १७.२ |
| ४. | आठवी ते दहावी | १७ | ८.३ |
| ५. | अकरावी ते बारावी | ६ | २.९ |
| ६. | **एकूण** | **२०४** | **१००.०** |
| ७. | **लागू नसलेले** | **५६** | |
| | **एकूण** | **२६०** | |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखात बालकामगारांच्या वडीलांची शैक्षणिक पातळी दर्शविण्यात आली आहे.

## आलेख क्र. ५.१२

## बालकामगारांची वडीलांची शैक्षणीक पातळी




तक्ता क्र. ५.१२ मध्ये अभ्यासासाठी निवडलेल्या बालकामगारांच्या वडीलांची शैक्षणिक पातळी दर्शविली आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये ३७.७% बालकामगारांचे वडील अशिक्षित आहेत. ३३.८% बालकामगारांच्या वडीलांनी १ली ते ४ थी पर्यंतचे शिक्षण घेतलेले

आहे. १७.२% बालकामगारांच्या वडीलांनी ५वी ते ७ वी पर्यंतचे शिक्षण घेतलेले आहे. ८. ३% बालकामगारांच्या वडीलांनी ८ वी ते १० वी पर्यंतचे शिक्षण घेतलेले आहे. २.९% बालकामगारांच्या वडीलांनी १२ वी पर्यंतचे शिक्षण घेतलेले आहे. याचा अर्थ असा की, बालकामगारांच्या कुटूंबातील माता पेक्षा त्यांचे वडील जास्त शिक्षित आहेत. वडीलांच्या तुलनेत माता जास्त अशिक्षित आहेत. वडीलांच्या शिक्षणाचा विचार करता त्यांच्या कुटूंबात बालकामगार असायला नकोत. परंतू आर्थिक गरीबीमुळे नाईलाजाने मुलांकडून काम करवून घेतले जाते. लागू नसलेले ५६ बालकामगार आहेत.

### ५.१३ बालकामगारांच्या निवासाची स्थिती :

प्रस्तूत अध्ययनात बालकामगार हे स्थानिक आहेत का स्थलांतर करुन आलेले आहेत हे पाहणे आवश्यक आहे. पुढील तक्ता क्र. ५.१३ मध्ये बालकामगारांच्या निवासाची स्थिती स्पष्ट केली आहे.

**तक्ता क्र. ५.१३**

**बालकामगारांच्या निवासाची स्थिती.**

| अ.क्र. | निवासाची स्थिती | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | सोलापूर | २६० | १००.० |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखामध्ये बालकामगारांची निवासाची स्थिती दर्शविली आहे.

**आलेख क्र. ५.१३**

**बालकामगारांच्या निवासाची स्थिती**



तक्ता क्र. ५.१३ मध्ये अभ्यासासाठी निवडलेल्या बालकामगार कोणत्या क्षेत्रातील आहेत हे दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये १००% बालकामगार हे सोलापूरचेच रहिवासी आहेत.

### ५.१४ बालकामगारांचे काम करण्याचे कारण :

घरातील बालक लहानपणातच बालकामगार बनतात यापेक्षा त्या कुटूंबाचे दुसरे दुर्देव काही असू शकत नाही. परंतू सदरील कुटूंबाचा आर्थिक व सामाजिकदृष्टया असलेले मागासलेपण, दारिद्रय वगैरे अनेक कारणांमुळे बालकांना मजूरीसाठी जावे लागते. प्रस्तुत पाहणीतील बालक देखील मजूरी करतात. परंतू त्या पाठीमागची कारणे कोणती आहेत ते पुढील तक्ता क्र. ५.१४ मध्ये स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ५.१४**

**बालकामगारांचे काम करण्याचे कारण.**

| अ.क्र. | काम करण्याचे कारण | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | गरीबी | ४२ | १६.२ |
| २. | हालाखिची परिस्थिती | १३ | ५.० |
| ३. | आई वारली | ५ | १.९ |
| ४. | वडील वारले | ४२ | १६.२ |
| ५. | आई वडील वारले | ५ | १.९ |
| ६. | घरात खूप लोक आहेत | १२ | ४.६ |
| ७. | घरातील सदस्यांना कमी वेतन | ५२ | २०.० |
| ८. | घरातील सदस्य बेरोजगार आहेत | ७ | २.७ |
| ९. | शाळा सोडली | ३ | १.२ |
| १०. | वडीलांना काम नाही | ७ | २.७ |
| ११. | रोज खर्चाला पैसे हवेत | १५ | ५.८ |
| १२. | शाळेत जावेसे वाटत नाही | १३ | ५.० |
| १३. | वडीलांसोबत काम करतो | ११ | ४.२ |
| १४. | आई सोबत काम करते | २६ | १०.० |
| १५. | आईवडील कामाला जा म्हणतात | ५ | १.९ |
| १६. | वडीलांना सिझनेबल काम आहे | २ | ०.८ |
| | **एकूण** | **२६०** | **१००.०** |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखामध्ये बालकामगारांचे काम करण्याचे कारण दर्शविले आहे.

**आलेख क्र. ५.१४**
**बालकामगारांचे काम करण्याचे कारण**




तक्ता क्र. ५.१४ मध्ये अभ्यासासाठी निवडलेले बालकामगार हे काम का करतात हे दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये १६.२% बालकामगार हे घरची परिस्थिती गरीबीची आहे म्हणून काम करतात. ५.०% बालकामगार हे हालाखिची परिस्थिती असल्यामुळे काम करतात. १.९% बालकामगार हे आई वारली आहे म्हणून काम करतात. १६. २%बालकामगार हे वडील वारले आहेत म्हणून काम करतात. वडील वारल्यामुळे कुटूंबाचा चरितार्थ चालविणे कठीण बनते. १.९% बालकामगार हे आपले आई वडील दोघेही वारले आहेत म्हणून काम करतात. या बालकामगारांची स्थिती अत्यंत हालाकिची आहे. कोणत्याही परिस्थितीत त्यांना काम करणे मजबूरीचे बनते. याचाच फायदा मालकवर्ग घेतात आणि त्यांचे शोषण करतात. बरेच बालकामगार हे हॉटेलात वगैरे काम करतात आणि रात्री काही उरलेले खावून तिथेच बाकडयावर आपली रात्र घालवतात. या बालकामगारांना काम करत असल्यामुळे शाळेतही जाता येत नाही. ४.६% बालकामगार हे घरात सदस्य संख्या जास्त असल्यामुळे उत्पन्नाची कमतरता भासते म्हणून काम करतात. बरेच बालकामगारांचे कुटूंब हे अशिक्षित आहे आणि शिक्षणाच्या व विशेष कौशल्याच्या अभावी त्यांना मिळेल ते काम करणे ही त्यांची मजबूरी बनते. त्यांना मिळणारे उत्पन्न हे बरेच कमी असते. त्यामुळे घरातील सर्वांचा जीवनचरितार्थ चालविणे अवघड बनते. परिणामी बालकांनाही काम करावे लागते. २०.०%

बालकामगार हे घरातील कुटूंब प्रमुखाला वेतन कमी आहे म्हणून काम करतात. बालकामगारांना असे वाटते की आपण काम केल्यामुळे कुटूंबातील उत्पन्ना भर पडेल म्हणून काम करतात. २.७% बालकामगार हे घरातील कुटूंब प्रमुख बेरोजगार आहेत म्हणून काम करतात. काही बालकामगारांच्या कुटूंबातील वयस्क व्यक्ती अपंग आहेत. त्यामुळे ते काम करु शकत नाही. काही बालकामगारांच्या कुटूंबातील व्यक्तींना दारुचे वगैरे व्यसन आहे. व्यसनापायी ते काम करत नाहीत. म्हणून मजबूरीवश बालकामगारांना काम करावे लागते. १.२% बालकामगार हे शाळा सोडली म्हणून काम करतात. काही बालकामगारांना शाळेत जाणे आवडत नाही त्यांना शिक्षणाचे महत्व माहित नाही. म्हणून काही तरी काम करावे या उद्देशाने काम करतात. २.७% बालकामगार हे वडीलांना काम नाही म्हणून काम करतात. ५.८% बालकामगार हे रोज खर्चाला पैसे हवेत म्हणून काम करतात. घरातून त्यांना रोज खर्चाला हवे तसे पैसे मिळत नाही. म्हणून आपणच काम करुन आपल्या खर्चाची तरतूद करावी या उद्देशाने काम करतात. ५०% बालकामगार हे शाळेत जावेसे वाटत नाही म्हणून काम करतात. शाळेत जायला लागू नये म्हणून कामात व्यस्त आहे असे दाखवून देण्यासाठी काम करतात. ४.२% बालकामगार हे वडीलांसोबत कामात मदत करण्यासाठी काम करतात. याठिकाणी बऱ्याचा बालकामगारांना कामाचा मोबदला मिळत नाही कारण वडीलांना कामात मदत करत आहेत. येथे बालकामगाराचे आर्थिक शोषण होत असते. १०.०% बालकामगार हे आईसोबत काम करतात. यामध्ये बालिका कामगारांची संख्या जास्त आहे. विशेषत: घरकाम करणाऱ्या मातांसोबत या बालिका कामावर जातात. बऱ्याच बालकामगारांच्या माता हया आजारी असतात. त्याच्या हातून तेवढे काम होत नाही म्हणून मदतीला आपल्या मुलांना नेतात. १.९% बालकामगार हे आईवडील कामाला जा म्हणतात. काहीतरी कमवून आण म्हणून काम करतात. याठिकाणी बालकामगारांच्या आईवडीलांना मुलांच्या शिक्षणाचे महत्व नाही. त्यांना फक्त मुलांच्या कमाईशी मतलब असते. ०.८% बालकामगार हे वडीलांना सिझनेबल काम असते म्हणून काम करतात. यामध्ये बरेच बालकामगारांचे वडील पेंटर आहेत परंतू रंगकाम हे रोजचे नसते. जेव्हा मागणी असते ते त्यांची कमाई होते. काही बालकामगारांचे वडील बिगारीचे काम करतात. हे काम रोजचे नसते जेव्हा मागणी असेल तेव्हा काम मिळते म्हणून बालकामगारांना काम करावे लागते.

## ५.१५ बालकामगारांचे काम करण्याची परिस्थिती :

१४ वयोगटाच्या आतील व्यक्तींना बालकामगार म्हणले जाते. म्हणजे ते बालक आहेत. बालकांची शारिरीक परिस्थिती नाजूक असते. कठोर परिश्रम त्यांना झेपत नाही. ते त्यांच्या आरोग्यास धोकादायक असते. वरील तक्त्यात बालकामगार कोणत्या स्वरुपाचे काम करतात हे पाहिले. परंतू ते कशा पद्धतीने काम करतात हे ही पाहणे महत्वाचे आहे. प्रस्तूत अध्ययनात जवळपास ७५ टक्के बालकामगार उभे राहून ८ ते १२ तास काम करतात. याचा अर्थ असा की बालकामगारांचे आरोग्य धोकादायक होऊ शकते. कारण ८ ते १२ तास उभे राहून काम करणे हे या बालकांच्या वयाचे काम नाही. त्यासाठी बालकामगारांची काम करण्याची परिस्थिती पाहणे महत्वाचे आहे. पुढील तक्ता क्र. ५.१५ मध्ये बालकामगारांची काम करण्याची परिस्थिती स्पष्ट केली आहे.

**तक्ता क्र. ५.१५**

**बालकामगारांचे काम करण्याची परिस्थिती.**

| अ.क्र. | काम करण्याची परिस्थिती | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | बसून काम करतात | ६५ | २५.० |
| २. | उभे राहून काम करतात | १९५ | ७५.० |
| | **एकूण** | **२६०** | **१००.०** |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखामध्ये बालकामगारांचे काम करण्याची परिस्थिती दर्शविली आहे.

**आलेख क्र. ५.१५**

**बालकामगारांचे काम करण्याची परिस्थिती**



तक्ता क्र. ५.१५ मध्ये अभ्यासासाठी निवडलेल्या बालकामगार काम कशा पद्धतीने करतात हे दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये २५.०% बालकामगार हे बसून काम करतात. आणि ७५.०% बालकामगार हे उभे राहून काम करतात. जे बालकामगार बसून काम करतात ते जास्त करुन बिडी बनविण्याचे, आणि भांडी घासणे, कपडे धुणे वगैरे प्रकारचे काम करतात. परंतू उभे राहून काम करणाऱ्या बालकामगारांची संख्या सर्वात अधिक आहे. यावरुन हे लक्षात येते जे बाल कामगार उभारुन काम करतात त्यांना पाय दुखणे वगैरे प्रकारच्या समस्यांचा सामना करावा लागतो. आणि जे बालकामगार बसून काम करतात त्यांना पाठीच्या कणांचा त्रास होण्याचा संभव असतो.

## ५.१६ बालकामगारांच्या काम करण्याचा कालावधी :

प्रस्तूत अध्ययनात बालकामगार हे १४ वर्षाच्या आतील आहेत. म्हणजेच बालकामगारांनी त्यांच्या कामाची सुरुवात देखिल अतिशय कमी वयात केलेली असेल. सदरील पाहणीतील बालकामगारांनी कामास सुरुवात करुन किती कालावधी झाला याचा शोध घेणे महत्वाचे ठरते. बालकामगारांनी कामाची सुरुवात केव्हापासून केली आहे. याबाबतच्या तपशिलाचे वर्गीकरण पुढील तक्ता क्र. ५.१६ मध्ये स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ५.१६**

**बालकामगारांच्या काम करण्याचा कालावधी.**

| अ.क्र. | काम करण्याचा कालावधी | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | १ ते ६ महिने | ४ | १.५ |
| २. | ७ ते १२ महिने | ३९ | १५.० |
| ३. | १ ते २ वर्ष | ८७ | ३३.५ |
| ४. | २ ते ३ वर्ष | ५८ | २२.३ |
| ५. | ३ ते ४ वर्ष | ५५ | २१.२ |
| ६. | ४ ते ५ वर्ष | १३ | ५.० |
| ७. | ५ ते ६ वर्ष | ३ | १.२ |
| ८. | ६ ते ७ वर्ष | १ | ०.४ |
| | **एकूण** | **२६०** | **१००.०** |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखामध्ये बालकामगारांच्या काम करण्याच्या कालावधी दर्शविले आहे.

**आलेख क्र. ५.१६**

**बालकामगारांच्या काम करण्याचा कालावधी**




तक्ता क्र. ५.१६ मध्ये अभ्यासासाठी निवडलेले बालकामगार किती काळापासून काम करत आहेत हे दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये १.५%बालकामगार हे ६ महिने झाले काम करत आहेत. १५.०%बालकामगार हे ७ ते १२ महिने झाले काम करत आहेत. ३३.५%बालकामगारांना १ ते २ वर्ष झाले काम करत आहेत. २२.३%बालकामगारांर २ ते ३ वर्ष झाले काम करत आहेत. २१.२%बालकामगारांना ३ ते ४ वर्ष झाले काम करत आहेत. ५.०%बालकामगारांना ४ ते ५ वर्ष झाले काम करत आहेत. १.२%बालकामगारांना ५ ते ६ वर्षे झाली काम करत आहेत. ०.४%बालकामगारांना ६ ते ७ वर्षे झाली काम करत आहेत. याचा अर्थ असा की, इतक्या काळापासून हे काम करत आहेत म्हणजे याचा परिणाम त्यांच्या शिक्षणावर आणि आरोग्यावर याचा परिणाम होत आहे. बरेच बालकामगार हे शाळेत जात नाहीत. आणि इतका काळ जर ते काम करत असल्यामुळे ते नियमित शाळेत जाऊ शकत नाहीत. याचा परिणाम त्यांच्या शैक्षणीक दर्जावर निश्चित होतो.

### ५.१७ बालकामगारांच्या काम करण्याचे तास :

बालकामगारांच्या समस्यांचे अध्ययन करताना त्यांच्या काम करण्याच्या तासाबाबत अध्ययन करणे गरजेचे आहे. कारण बालकामगार अधिक तास काम करत असतील तर ते त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने धोक्याचा संकेत आहे. पुढील तक्ता क्र. ५.१७ मध्ये बालकामगारांच्या काम करण्याच्या तासांबाबत माहिती स्पष्ट केली आहे.

**तक्ता क्र. ५.१७**

**बालकामगारांच्या काम करण्याचे तास.**

| अ.क्र. | कामाचे तास | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | २ ते ४ तास | २ | ०.८ |
| २. | ५ ते ७ तास | ८८ | ३३.८ |
| ३. | ८ ते १० तास | १६२ | ६२.३ |
| ४. | ११ ते १२ तास | ८ | ३.१ |
| | **एकूण** | **२६०** | **१००.०** |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखामध्ये बालकामगारांच्या काम करण्याच्या तास दर्शविले आहे.

**आलेख क्र. ५.१७**

**बालकामगारांचे काम करण्याचे तास**



तक्ता क्र. ५.१७ मध्ये अभ्यासासाठी निवडलेले बालकामगार किती तास काम करत आहेत हे दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये ०.८%बालकामगार हे २ ते ४ तास काम करतात. ३३.८%बालकामगार हे ५ ते ७ तास काम करतात. ६२.३%बालकामगार हे ८ ते १० तास काम करतात. ३.१%बालकामगार हे ११ ते १२ तास काम करतात. याचा अर्थ जवळपास निम्म्या पेक्षा जास्त (६२.३%) बालकामगार हे ८ ते १० तास करत आहेत म्हणजे त्यांच्या शारिरीक क्षमतेपेक्षा जास्त काम करतात. बऱ्याच बालकामगारांना काम करताना विश्रांतीदेखिल मिळत नाही. परिणामी त्यांच्या आरोग्यावर याचा प्रतिकूल परिणाम होणे स्वाभाविक आहे. म्हणजे येथे बालकामगारांचे शारिरीक शोषण होत आहे. निरंतर व जास्त वेळ काम केल्याने विविध समस्यांचा सामना त्यांना करावा लागत आहे. जितका वेळ ते श्रम करतात त्या तुलनेने त्यांना मिळणारा मोबदला खूप कमी आहे. म्हणजे त्यांचे आर्थिक शोषणही होत आहे. जर बालकामगार इतका वेळ कामासाठी देतात तर ते आपल्या शिक्षणाला किती वेळ देत असतील ही विचार करण्याची बाब आहे. ३.१%बालकामगार हे ११ ते १२ तास काम करतात. त्यांची स्थितीतर याही पेक्षा भयानक आहे. त्यांच्या वयोमानानुसार ते जितका वेळ काम करतात त्यामुळे त्यांना स्वत:साठी वेळ मिळत नाही. याचा परिणाम त्यांना मनावर होतो म्हणजे त्यांचे मानसिक शोषण होते.

### ५.१८ बालकामगारांना काम करताना मिळणारी विश्रांती :

औपचारीक क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यासाठी दररोज मध्यांतर भोजन आणि विश्रांतीसाठी निश्चितपणे वेळ ठरवून दिलेली असते. मध्यांतर विश्रांतीची वेळ कटाक्षाने पाळली जाते. मात्र अनौपचारिक क्षेत्रात विविध नोकरी, उद्योग तथा विविध व्यवसायांमध्ये काम करणाऱ्या बालकामगारांसाठी दररोजच्या भोजनासाठी विश्रांतीची वेळ निश्चित नसते. कारण, बालकामगारांच्या बाबतीत मध्यांतर विश्रांतीची वेळ त्यांचे काम, व्यवसायाचा प्रकार, नोकरी अथवा कामाचे स्वरुप आणि कामाचे तास यावर साधारणत: अवलंबून असते. बालकामगारांना काम करीत असताना मध्यांतर विश्रांतीसाठी वेळ मिळतो का? याबाबतचे वर्गीकरण पुढील तक्ता क्र. ५.१८ मध्ये स्पष्ट केले आहे.

### तक्ता क्र. ५.१८

### बालकामगारांना काम करताना मिळणारी विश्रांती.

| अ.क्र. | विश्रांतीबाबत | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | विश्रांती मिळते | ४१ | १५.८ |
| २. | विश्रांती मिळत नाही | २१९ | ८४.२ |
| | **एकूण** | **२६०** | **१००.०** |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखामध्ये बालकामगारांच्या काम करताना विश्रांती मिळते किंवा नाही हे दर्शविले आहे.

### आलेख क्र. ५.१८

### बालकामगारांचे काम करताना मिळणाऱ्या विश्रांती




तक्ता क्र. ५.१८ मध्ये अभ्यासासाठी निवडलेले बालकामगारांना काम करत असताना विश्रांती मिळते किंवा मिळत नाही हे दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये १५.८%बालकामगारांना काम करत असताना विश्रांती मिळते. आणि ८४.२%बालकामगारांना काम करत असताना विश्रांती मिळत नाही. याचा अर्थ बहुतांशी बालकामगारांना काम करत असताना विश्रांती मिळत नाही. म्हणजे वयोमानानुसार त्यांना विश्रांती मिळणे आवश्यक आहे. विश्रांती न मिळाल्याने त्यांच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होतो. त्याच बरोबर जर काम करत असताना जर व्यक्तीला थोडीबहूत विश्रांती मिळाली तर पुढील कामात चुका होण्याची शक्यता कमी असते. परंतू येथे बालकामगारांना विश्रांतीच मिळत नसेल तर कामात चुका होण्याची शक्यता

जास्त असते. कामात चुका झाल्याने बालकामगारांना ओरडा, शिव्या व प्रसंगी मारही खावा लागतो. म्हणजे येथे बालकामगारांचे शारिरीक व मानसिक शोषण होते. काही बालकामगारांना कामात सुट्टयाही मिळत नाही. व बऱ्याच बालकामगारांना आठवडयाची सुट्टी देखिल मिळत नाही.

### ५.१९ बालकामगारांना काम करताना मिळणाऱ्या विश्रांतीचा कालावधी :

बालकामगारांना काम करताना विश्रांती मिळते का नाही हे पाहिल्यानंतर बालकामगारांना किती विश्रांती मिळते ते पाहणे आवश्यक आहे. पुढील तक्ता क्र. ५.१९ मध्ये बालकामगारांना काम करताना मिळणाऱ्या विश्रांतीच्या कालावधी स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ५.१९**

**बालकामगारांना काम करताना मिळणाऱ्या विश्रांतीचा कालावधी.**

| अ.क्र. | विश्रांतीचा कालावधी | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | विश्रांती मिळत नाही | २१ | ५१.२ |
| २. | १ तासापर्यंत | १९ | ४६.३ |
| ३. | १ ते २ तास | १ | २.४ |
| | **एकूण** | **४१** | **१००.०** |
| | **लागू नसलेले** | **२१९** | |
| | **एकूण** | **२६०** | |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखामध्ये बालकामगारांच्या काम करताना मिळणाऱ्या विश्रांतीची कालावधी दर्शविले आहे.

**आलेख क्र. ५.१९**

**बालकामगारांना काम करताना मिळणारी विश्रांतीची कालावधी**



तक्ता क्र. ५.१९ मध्ये अभ्यासासाठी निवडलेले बालकामगारांना काम करत असताना किती वेळ विश्रांती मिळते किंवा मिळत नाही हे दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये ५१.२% बालकामगारांना विश्रांती मिळत नाही. ज्या बालकामगारांना विश्रांती मिळते त्यापैकी ४६.३% बालकामगारांना अर्धा तास ते १ तासांपर्यंत विश्रांती मिळते. २.४% बाल कामगारांना १ तास ते २ तासापर्यंत विश्रांती मिळते. याचा अर्थ जवळपास निम्म्या बालकामगारांना काम करताना विश्रांती मिळत नाही. ज्या बालकामगारांना काम करताना विश्रांती मिळते जी त्यांच्या स्वास्थासाठी आवश्यक आहे. कामात विश्रांती मिळत असल्यामुळे या बालकामगारांकडून कामात तुलनेने कमी चुका होतात. लागू नसलेले २१९ बालकामगार आहेत.

## ५.२० बालकामगारांसोबत मालकांचे वर्तनाची पातळी :

प्रस्तुत विषयाचे अध्ययन करताना मालक वर्गाकडून बालकामगारांना कशा पद्धतीची वागणूक मिळते. हे अभ्यासण्यासाठी मालकांचे बालकामगारांच्या बाबतीतच्या वर्तनाची पातळी पाहणे आवश्यक आहे. पुढील तक्ता क्र. ५.२० मध्ये बालकामगारांसोबत मालकांच्या वर्तनाची पातळी स्पष्ट केली आहे.

**तक्ता क्र. ५.२०**

**बालकामगारांसोबत मालकांचे वर्तनाची पातळी.**

| अ.क्र. | वर्तनाची पातळी | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | मध्यम | १८८ | ७२.३ |
| २. | कठोर | १ | ०.४ |
| ३. | प्रेमाने | २४ | ९.२ |
| ४. | अशिष्ट | ४७ | १८.१ |
| | **एकूण** | **२६०** | **१००.०** |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखामध्ये बालकामगारांसोबत मालकांचे वर्तन पातळी दर्शविले आहे.

### आलेख क्र. ५.२०

### बालकामगारांसोबत मालकांचे वर्तनाची पातळी




तक्ता क्र. ५.२० मध्ये अभ्यासासाठी निवडलेले बालकामगारांसोबत मालक वर्ग कशा पद्धतीने व्यवहार करतात याची पातळी दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये ७२.३% बालकामगारांसोबत मध्यम व्यवहार करतात. ०.४% बालकामगारांसोबत कठोर व्यवहार केले जाते. ९.२% बालकामगारांसोबत प्रेमाने व्यवहार केले जाते. आणि १८.१% बालकामगारांसोबत अशिष्ट व्यवहार केला जातो. याचा अर्थ बऱ्याच बालकामगारांसोबत चांगला व्यवहार केला जात नाही. केवळ ९.२% बालकामगारांसोबत प्रेमाने व्यवहार केले जाते.

### ५.२१ बालकामगारांसोबत मालकांचे वर्तन :

प्रस्तुत विषयाचे अध्ययन करताना मालक वर्गाकडून बालकामगारांना कशा पद्धतीची वागणूक मिळते. हे अभ्यासण्यासाठी मालकांचे बालकामगारांच्या बाबतीतचे वर्तन पाहणे आवश्यक आहे. पुढील तक्ता क्र. ५.२१ मध्ये बालकामगारांसोबत मालकांचे वर्तन स्पष्ट केली आहे.

### तक्ता क्र. ५.२१

### बालकामगारांसोबत मालकांचे वर्तन.

| अ.क्र. | मालकाचे वर्तन | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | मारतात | ५२ | २०.० |
| २. | प्रेमाने | २३ | ८.८ |
| ३. | सामान्य | १८५ | ७१.२ |
| | एकूण | २६० | १००.० |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखामध्ये बालकामगारांसोबत मालकांचे वर्तन दर्शविले आहे.

### आलेख क्र. ५.२१

### बालकामगारांसोबत मालकांचे वर्तन




तक्ता क्र. ५.२१ मध्ये अभ्यासासाठी निवडलेले बालकामगारांसोबत मालक वर्ग कशा पद्धतीने वागतात दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये २०.०% बालकामगारांना मारतात. ८.८% बालकामगारांसोबत प्रेमाने वागवीले जाते. आणि ७१.२% बालकामगारांत सामान्य वागणूक दिली जाते. यामध्ये त्यांना ओरडा खावा लागतो. परंतू २०.०% बालकामगारांना मार खावा लागतो. मजबूरीवश त्यांना मार खावून काम करावे लागते. येथे बालकामगारांचे शारिरीक, मानसिक शोषण होते. परंतू काही मालक असेही आहेत जे बालकामगारांसोबत प्रेमाने वागतात. ते बालकामगारांची परिस्थिती जाणतात म्हणून त्यांच्याशी मायेने वागतात. परंतू ही संख्या त्यामानाने खूप कमी आहे.

## ५.२२ बालकामगारांची आपल्या कामाबाबतची संतुष्टी :

बहूतांशी बालकामगारांना इतर मुलांसारखे जीवन जगावेसे वाटते. परंतू अशा काही परिस्थिती निर्माण होतात जेणेकरुन त्यांना मजूरी करावी लागते. जे त्यांच्या भविष्यासाठी चांगले नाही. बालकामगारांना कराव्या लागणाऱ्या श्रमाबाबत स्वत: बालमजूरांचे मत काय आहे, ते आपल्या कामाबाबत संतुष्ट आहेत का. हे पाहणे महत्वाचे आहे. पुढील तक्ता क्र. ५.२२ मध्ये बालकामगारांची आपल्या कामाबाबतची संतुष्टी स्पष्ट केली आहे.

**तक्ता क्र. ५.२२**

**बालकामगारांची आपल्या कामाबाबतची संतुष्टी.**

| अ.क्र. | कामाबाबत संतुष्ट | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | कामाबाबत संतुष्ट आहेत | ८७ | ३३.५ |
| २. | कामाबाबत संतुष्ट नाहीत | १७३ | ६६.२ |
| | **एकूण** | **२६०** | **१००.०** |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखामध्ये बालकामगारांची आपल्या कामाबाबतची संपुष्टी दर्शविले आहे.

**आलेख क्र. ५.२२**

**बालकामगारांची आपल्या कामाबाबतची संतुष्टी**



तक्ता क्र. ५.२२ मध्ये अभ्यासासाठी निवडलेले बालकामगारांद्वारे किती बचत केली जाते हे दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये ३३.५% बालकामगार हे आपल्या कामाच्या प्रती संतुष्ट आहेत. आणि ६६.५% बालकामगार हे आपल्या कामाच्या प्रती संतुष्ट नाहीत. याचा अर्थ असा की, जवळपास ६६.५ बालकामगार हे मजबूरीने, परिस्थितीवश काम करत आहेत. यापैकी बऱ्याच बालकामगारांना काम करावेसे वाटत नाही त्यांना शिक्षण घ्यावेसे वाटते. किंवा दुसरे चांगले काम करावेसे वाटते. परंतू शिक्षणाच्या अभावी आणि कौशल्याच्या अभावी त्यांना मनात नसताना देखिल मजबूरीने काम करावे लागते.

**५.२३ बालकामगारांचे कामाच्या प्रती भावना :**

बालकामगारांना श्रमाच्या बाजारात पाठवून दिले जाते. ते मजबूरीने किंवा स्वत: घेतलेल्या निर्णयामुळे असू शकते. बालकामगार काम करतात परंतू त्यांना कराव्या लागणाऱ्या कामाच्या प्रती स्वत: बालकामगारांची मनीषा काय आहे ते पुढील तक्ता क्र. ५.२३ मध्ये स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ५.२३**

**बालकामगारांचे कामाच्या प्रती भावना.**

| **अ.क्र.** | **कामाच्या प्रती भावना** | **उत्तरदाते** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | जे काम करत आहेत तेच पुढेही करावेसे वाटते | १०० | ३८.५ |
| २. | याहीपेक्षा चांगले काम करावेसे वाटते | ६७ | २५.८ |
| ३. | शिक्षण घ्यावेसे वाटते | ७१ | २७.३ |
| ४. | दुसरे वेगळे काम करावेसे वाटते | २२ | ८.५ |
| | **एकूण** | **२६०** | **१००.०** |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखामध्ये बालकामगारांची कामाच्या प्रती भावना दर्शविले आहे.

### आलेख क्र. ५.२३

### बालकामगारांची कामाच्या प्रती भावना




तक्ता क्र. ५.२३ मध्ये अभ्यासासाठी निवडलेले बालकामगारांचे आपल्या कामाच्या प्रती कोणत्या भावना आहेत हे दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये ३८.५% बालकामगारांना जे काम करत आहोत तेच पुढेही करावेसे वाटते. २५.८% बालकामगारांना जे काम करत आहे त्याहीपेक्षा चांगले काम करावेसे वाटते. २७.३% बालकामगारांना काम सोडून शिक्षण घ्यावेसे वाटते. परंतू मजबूरीवश ते शिक्षण घेऊ शकत नाहीत. ८.५% बालकामगारांना जे काम करत आहे त्याचा कंटाळा आला आहे त्यांना वाटते याहीपेक्षा दुसरे काम करावे. याचा अर्थ असा की बालकामगार जे काम करत आहे त्यातून त्यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. शिव्या खाणे, मार खाणे, कमी वेतन मिळणे वगैरे मुळे त्यांना दुसरे काम करावेसे वाटते. परंतू असेही बालकामगार आहेत ज्यांना काम सोडून शिक्षण घ्यावेसे वाटते. त्यांना शिक्षणाचे महत्व माहित आहे. शिक्षणामुळे पुढे याही पेक्षा चांगले काम मिळेल असे त्यांचे मत आहे.

## ५.२४ बालकामगारांना मिळणाऱ्या फावल्या वेळेचा उपयोग :

बालकामगारांना ८–१० तास काम करावे लागते. काम करुन आल्यानंतर जो फावला वेळ मिळतो त्या वेळेत ते काय करतात हे पाहणे आवश्यक आहे. सदरील पाहणीत असे आढळून आले आहे की, बहूतांशी बालिका कामगारांना कामावरुन आल्यानंतरही घरी जेवण बनविणे किंवा घरकामात मदत करण्याचे काम करावे लागते. पुढील तक्ता क्र. ५.२४ मध्ये बालकामगारांना मिळणाऱ्या फावल्या वेळेचा उपयोग स्पष्ट केला आहे.

**तक्ता क्र. ५.२४**

**बालकामगारांना मिळणाऱ्या फावल्या वेळेचा उपयोग.**

| अ.क्र. | फावल्या वेळेचा उपयोग | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | लिहीत वाचत असतात | ३० | ११.५ |
| २. | खेळत असतात | ७७ | २९.६ |
| ३. | जेवण बनविण्याचे काम करतात | ३२ | १२.३ |
| ४. | टि.व्ही. पाहतात | ३८ | १४.६ |
| ५. | काही करत नाहीत. | ८३ | ३१.९ |
| | **एकूण** | **२६०** | **१००.०** |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखामध्ये बालकामगारांना मिळणाऱ्या फावल्या वेळेचा उपयोग दर्शविले आहे.

**आलेख क्र. ५.२४**

**बालकामगारांना मिळणाऱ्या फावल्या वेळेचा उपयोग**



तक्ता क्र. ५.२४ मध्ये अभ्यासासाठी निवडलेले बालकामगारांना मिळणाऱ्या फावल्या वेळेचा उपयोग कशापद्धतीने करतात हे दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये ११.५% बालकामगार मिळणाऱ्या फावल्या वेळेत लिहीत वाचत असतात. हे असे बालकामगार आहेत ज्यांना शिक्षणाची आवड आहे. काम करुन विशेष शाळेत ते शिक्षणही घेत आहेत. २९.६% बालकामगार मिळणाऱ्या फावल्या वेळेत गल्ली, वस्त्यामध्ये खेळत असतात. १२.३% बालकामगार हे मिळणाऱ्या फावल्या वेळेत जेवण बनविण्याचे काम करतात. यामध्ये बालिका कामगारांची संख्या जास्त आहे. मुली जेवण बनविणे, घरकाम करायला यायला पाहिजे म्हणून त्यांच्याकडून घरातील काम करवून घेतात. बऱ्याच बालकामगारांच्या घरात त्यांची आई वारली आहे किंवा सतत आजारी असल्यामुळे विशेषत: बालिका कामगारांना जेवण बनविण्याचे काम करावे लागते. १४.६% बालकामगार हे मिळणाऱ्या फावल्या वेळेत टि.व्ही पाहत असतात. आपल्या घरात किंवा दुसऱ्यांच्या घरात जावून हे टि.व्ही. पाहत असतात. ३१.९% बालकामगार हे काहीही करत नाहीत.

### ५.२५ बालकामगारांची महत्वाकांक्षा / ध्येय :

बालकामगारांना इतर बालकांकडे पाहून असे वाटते की, आपणही त्यांच्यासारखे चांगले जीवन जगावे. परंतू परिस्थितीवश त्यांना चांगले जीवन जगता येत नाही. भारत सरकारच्या राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पातील विद्यार्थ्यांना ध्येयाबाबत विचारण्यात आले असता काही बालकामगारांनी चांगली उत्तरे दिली की त्यांना मोठा व्यक्ती बनायचे आहे, शिक्षक, पोलिस, डॉक्टर व्हायचे आहे. तसेच काही बालकामगार हॉटेल, ढाबा, चायनिज गाडी वगैरे ठिकाणी काम करतात. त्यांना विचारले असता त्यांनाही त्यांच्या मालकासारखे हॉटेलचा मालक व्हायचे आहे असे सांगण्यात आले. काहींनी काही प्रतिक्रिया दिली नाही. पुढील तक्ता क्र. ५.२५ मध्ये बालकामगारांचे ध्येय स्पष्ट केले आहे.

## तक्ता क्र. ५.२५

## बालकामगारांची महत्वाकांक्षा / ध्येय.

| अ.क्र. | महत्वाकांक्षा/ध्येय | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | पोलिस | २ | ०.८ |
| २. | शिक्षक | ८ | ३.१ |
| ३. | डॉक्टर | ४ | १.५ |
| ४. | हॉटेलचा मालक | २० | ७.७ |
| ५. | मोठा व्यक्ती बनायचे आहे | २३ | ८.९ |
| ६. | माहित नाही | २०२ | ७८.० |
| | **एकूण** | **२५९** | **१००.०** |
| | **लागू नसलेले** | **१** | |
| | **एकूण** | **२६०** | |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखामध्ये बालकामगारांचे ध्येय दर्शविले आहे.

## आलेख क्र. ५.२५

## बालकामगारांचे ध्येय /महत्वाकांक्षा




तक्ता क्र. ५.२५ मध्ये अभ्यासासाठी निवडलेले बालकामगारांची महत्वाकांक्षा किंवा पुढे त्यांना काय व्हायचे आहे त्यांचे ध्येय दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये ०.८% बालकामगारांना मोठा झाल्यावर पोलिस व्हायचे आहे. ३.१% बालकामगारांना मोठे झाल्यावर

शिक्षक व्हायचे आहे. यामध्ये बहूसंख्य बालिका कामगारांची इच्छा आहे त्यांनी आपल्या शिक्षकांसारखे एक उत्कृष्ट व्यक्ती  बनायचे आहे. १.५% बालकामगारांनी मोठे झाल्यावर डॉक्टर होण्याची इच्छा व्यक्त केली आहे. ७.७% बालकामगारांनी मोठे झाल्यावर हॉटेलचा मालक होण्याची इच्छा व्यक्त केली आहे. यामध्ये बहूसंख्य बालकामगार हे हॉटेल, चायनिज गाडी, स्नॅक्स गाडी, भेळ गाडी वगैरे ठिकाणी काम करतात. त्यांच्या मालकांना पाहून त्यांना वाटते आपणही मोठे झाल्यावर अशा हॉटेलचे मालक बनावे. ८.९% बालकामगारांना मोठा माणूस व्हायचे आहे अशी इच्छा व्यक्त केली आहे. आणि ७८.०% बालकामगारांनी मोठे झाल्यावर काय व्हायचे आहे हे सांगितलेले नाही. याचा अर्थ असा की जवळपास २५% बालकामगारांना गरीबीतून वर यायचे आहे. काही तरी चांगले करण्याची जिद्द त्यांच्यामध्ये आहे. यासाठी ते प्रयत्नदेखिल करीत आहेत. परंतू परिस्थितीवश त्याच्या इच्छा कशा पुर्ण होतील ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. बरेच बालकामगार विशेष शाळांमधून शिक्षण घेत आहेत. प्रामाणिकपणे ते शिक्षण घेत आहेत. शिक्षकही अशा बालकामगारांना प्रोत्साहन देत आहेत. लागू नसलेले १ बालकामगार आहे.

## ५.२६ आई वडीलांना /पालकांना मदत करणारे बालकामगार :

प्रस्तूत पाहणीत असे आढळून आले की असे बरेच कुटूंब आहेत तिथे वयस्क कामगार त्यांच्यासोबत आपल्या मुलांमुलींना मदतीसाठी घेऊन जातात. घरकाम करणाऱ्या बऱ्याच माता आपल्या मुलींना मदतीसाठी घेऊन जातात. त्यापाठीमागची भुमिका अशी असते की, कामात मदत होईल आणि मुल ते कामही शिकेल. प्रस्तुत अध्ययनात असे किती बालकामगार आहेत जे आपल्या पालकांना मदत करतात ते पुढील तक्ता क्र. ५.२६ मध्ये स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ५.२६**

**आई वडीलांना /पालकांना मदत करणारे बालकामगार.**

| अ.क्र. | पालकांना मदत | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | पालकांना मदत करतात | ५२ | १००.० |
| | लागू नसलेले | २०८ | |
| | एकूण | २६० | |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखामध्ये आई वडीलांना /पालकांना मदत करणारे बालकामगारदर्शविले आहे.

**आलेख क्र. ५.२६**

**आई वडीलांना /पालकांना मदत करणारे बालकामगार.**




तक्ता क्र. ५.२६ मध्ये अभ्यासासाठी निवडलेले बालकामगारांपैकी किती बालकामगार आपल्या आईवडीलांना व पालकांना मदत करतात हे दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये २०.०% बालकामगार हे आपल्या आई वडीलांच्या व पालकांच्या कामात मदत करतात. याठिकाणी ते आपल्या पालकांना मदत करतात म्हणून त्यांना कामाचा मोबदला मिळत नाही. त्याचप्रमाणे ८०.०% बालकामगार हे स्वतंत्र काम करतात. ते पालकांच्या कामात मदत करीत नाही. परंतू त्यांना त्याच्या कामाचा मोबदला मिळतो. लागू नसलेले २०८ बालकामगार आहेत.

**५.२७ विशेष शाळेत शिक्षण घेणारे बालकामगार :**

भारत सरकारच्या राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पाच्या माध्यमातून बालकामगारांचे शैक्षणिक पुनर्वसन केले जाते. बालकामगार बहूलता क्षेत्रात व ज्या ठिकाणी बालकामगार आढळतात त्याठिकाणी सर्वेक्षण केले जाते आणि त्यांचे बालमजूरीतून निर्मुलन करुन शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सामिल करुन घेतले जाते. वयानुसार बालकांना त्या त्या वर्गात प्रवेश दिला जातो. शाळेत नियमित यावे व शाळा सोडून पुन्हा कामावर जाऊ नये म्हणून अशा विद्यार्थ्यांना विद्यावेतन दिले जाते. त्याचप्रमाणे गणवेश, शिक्षणाचे साहित्य, दुपारचे भोजन, आरोग्य सुविधा पुरविल्या जातात. पुढील तक्ता क्र. ५.२७ मध्ये विशेष शाळेत शिक्षण घेणारे बालकामगार स्पष्ट केले आहे.

### तक्ता क्र. ५.२७

### विशेष शाळेत शिक्षण घेणारे बालकामगार.

| अ.क्र. | विशेष शाळेत शिक्षण घेणारे बालकामगार | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | इयत्ता तिसरी | ३६ | २७.७ |
| २. | इयत्ता चौथी | ५५ | ४२.३ |
| ३. | इयत्ता पाचवी | २० | १५.४ |
| ४. | इयत्ता सहावी | १२ | ९.२ |
| ५. | इयत्ता सातवी | ७ | ५.४ |
| | **एकूण** | **१३०** | **१००.०** |
| | **लागू नसलेले** | **१३०** | |
| | **एकूण** | **२६०** | |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखामध्ये विशेष शाळेत शिक्षण घेणारे बालकामगारदर्शविले आहे.

### आलेख क्र. ५.२७

### विशेष शाळेत शिक्षण घेणारे बालकामगार.




तक्ता क्र. ५.२७ मध्ये अभ्यासासाठी निवडलेले बालकामगारांपैकी किती बालकामगार विशेष शाळेत शिक्षण घेत आहेत हे दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये एकूण १३० बालकामगार हे विशेष शाळेत शिक्षण घेत आहेत. त्या १३० बालकामगारांमध्ये २७.७%बालकामगार हे इयत्ता ३ री मध्ये शिकत आहेत. ४२.३% बालकामगार हे इयत्ता ४ थी

मध्ये शिकत आहेत. १५.४% बालकामगार हे इयत्ता ५ वी मध्ये शिकत आहेत. ९.२% इयत्ता ६ वी मध्ये शिकत आहेत. आणि ५.४% बालकामगार हे इयत्ता ७ वी शिकत आहेत. बालकामगारांसाठी विशेष शाळा राबविण्यात येतात. या विशेष शाळांच्या माध्यमातून बालकामगारांचे शैक्षणिक पुनर्वसन केले जाते. जे बालकामगार काम करतात आहेत. त्यांना या शाळेत प्रवेश दिला जातो. यामध्ये त्यांना शिक्षण, शिक्षणाचे साहित्य, गणवेश, दुपारचे भोजन दिले जाते. या विशेष शाळांमध्ये व्यावसायिक शिक्षणही दिले जाते. जेणेकरुन मोठे झाल्यावर स्वयंरोजगार, रोजगार करु शकतील. त्यामुळे आधूनिक युगातील संगणकाचे ज्ञानसुद्धा त्यांना करुन दिले जाते. प्रत्येक वर्षी सर्वेक्षण करुन बालकामगार आढळला तर त्यांला कामातून मुक्त करुन शाळेत दाखला दिला जातो. त्याचप्रमाणे दरमहा शिष्यवृत्तीही त्यांच्या खात्यात जमा केली जाते. यामध्ये लागू नसलेले १३० बालकामगार आहेत.